**मे. श्रध्दा एनर्जी एन्ड इंफ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (SEIPL), गाव-वरफळ, तालुका-परतूर, जिल्हा-जालना, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन १२०.० केएलपीडी क्षमतेचा "बी"/"सी" मोलॅसिस/शुगर केन ज्यूस/सिरपवर आधारित रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल/इथेनॉल १२०.० केएलपीडी उत्पादन उभारणीचा आसवणी प्रकल्प तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता (२५०० टीसीडी ते ४५०० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत-**

---

मे. श्रध्दा एनर्जी एन्ड इंफ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (SEIPL) गाव - वरफळ, तालुका-परतूर, जिल्हा-जालना, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन १२०.० केएलपीडी क्षमतेचा "बी"/"सी" मोलॅसिस/शुगर केन ज्यूस/सिरपवर आधारित रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल / इथेनॉल १२०.० केएलपीडी उत्पादन उभारणीचा आसवणी प्रकल्प तसेच सध्याची ऊस गाळप क्षमता (२५०० टीसीडी ते ४५०० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दिं. १४/०७/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना क्रंमाक एस.ओ. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना क्रंमाक एस.ओ. ३०६७ (इ) दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०६३०एफटीएस-०१३० दिनांक -३०-०६-२०२२ अन्वये पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

सदर जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके,** : अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जालना.

२. **श्री. सो. म. कुरमूडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

डॉ. योगिती बाळंखे, क्षेत्र अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी श्री केशव नेटके, अपर जिल्हादंडाधिकारी, जालना तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री सोमनाथ कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना तथा सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

डॉ. योगिती बाळंखे, यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मे. श्रध्दा एनर्जी एन्ड इंफ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (SEIPL) गाव -- वरफळ, तालुका-परतूर, जिल्हा-जालना, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित नवीन १२०.० केएलपीडी क्षमतेचा "बी"/"सी" मोलॅसिस/शुगर केन ज्यूस/सिरपवर आधारित रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल / इथेनॉल १२०.० केएलपीडी उत्पादन उभारणीचा आसवणी प्रकल्प तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता (२५०० टीसीडी ते ४५०० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि १३ जून, २०१९ रोजी सुधारित केल्यानुसार संवर्ग ए ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण सल्लागार म्हणून ग्रीन सर्कल, वडोदरा येथे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर

केला व त्यास अर्जास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ (मराठी) दिनांक १४ जून, २०२२ रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात (इंग्रजी) दिनांक १३ जून, २०२२ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हाधिकारी कार्यालय-जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, जालना, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, जालना , तहसीलदार, तहसील कार्यालय-परतूर, जिल्हा – जालना, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय - वरफळ, कोरेगाव, चिंचोली, मापेगाव, वरफळ रेवलगाव, तालुका –- परतूर, जिल्हा – जालना, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, औरंगाबाद, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट नं.पी-३/१ व पी-३/२, अतिरिक्त एमआयडीसी फेज-२, जालना व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

डॉ. योगिती बाळंखे, यांनी सांगितले की, आजपर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळास सदरहू प्रकल्पाबाबत एकही आक्षेप प्राप्त झालेला नाही. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप

नोंदविण्यासाठी आहे. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारला सादर करण्यात येईल. तसेच प्रकल्प सल्लागार यांना प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी सांगितले.

प्रकल्प सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा बाबतचे पावर पॉईंट सादरीकरण कलेल ज्यामध्ये पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी चा समावेश आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले:-

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे:-**

**१) श्री रामकिशन भाश्रोबा रुपनार, गाव -वरफळ, तालुका – परतूर, जिल्हा-जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात विविध यंत्रे, मशिनरी यांचा वापर करण्यात येईल. तर त्याच्या आवाजाचा परिसरातील रहिवाशांना काही त्रास होईल काय? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पात जास्त आवाज करणारी यंत्रे, मशिनरी वापरण्यात येत नाहीत. त्याचप्रमाणे प्रकल्पात विविध ठिकाणी ध्वनी नियंत्रणासाठी विविध उपाय, सायलेन्सर पॅडच्या माध्यामातून आवाजाची पातळी |

| | | |
|---|---|---|
| | | नियंत्रित करण्यात येईल. आवाज उत्पन्न होत असलेल्या मशिन्स जवळ काम करणा-या कामगारांना इअर प्लग/मफ पुरविण्यात येतील. प्रकल्पातील आवाजाची पातळी ही मानकांपेक्षा कमीच असणार आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना आवाजाच त्रास होणार नाही. |

**२) श्री मसरत नदीम शेख शेख शेखूर, सरपंच, वरफळ ग्रामपंचायत, तालुका-परतुर, जिल्हा-जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उत्पादन प्रक्रियेतून निघणारे सांडपाणी हे परिसरातील शेतकरी वापरु शकतील काय? | पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU) मध्ये प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा झेडएलडी-Zero Liquid Discharge आहे. |
| २) | प्रकल्प उत्पादनातील स्पेंट वॉशचा परिसरात काही त्रास होईल का? | प्रकल्पातील स्पेंट वॉश कोरडा करुन त्याचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येऊन ते शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यात रिच पोटॅश असते. |
| ३) | प्रकल्पातील राखेची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? | प्रकल्पात उत्पन्न होणारी राख ही स्थानिक वीट उत्पादकांना वीटनिर्मितीसाठी देण्यात येईल. त्यांच्याकडून राखेची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. |
| ४) | प्रकल्पाचा स्थानिकांना काही फायदा होईल काय? भविष्यात शेतक-याला ऊसाला जादा भाव मिळेल काय? | प्रकल्पातील उत्पादनामुळे कारखान्यास मिळणा-या अतिरिक्त उत्पन्नामुळे शेतक-यांच्या ऊसाला जादा भाव देता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | साखरेची गाळप क्षमता वाढल्यामुळे शेतक-यांच्या ऊसाचे त्वरित गाळप करण्यात येईल. त्यामुळे ऊसाचे उत्पन्न/yield वाढेल. त्यामुळे साखरेचे उत्पन्न वाढेल. कारखान्याला त्याचा फायदा झाल्यामुळे आजूबाजूच्या शेतक-यांनाही त्याचा फायदा होईल.<br>त्यावेळी कारखान्याचे चेअरमन, यांनी सांगितले की एफआरपी १००% देण्यात येते. अजून एक फॉर्मुला आहे ७०:३०. जर ३०% पेक्षा जास्त नफा झाला, तर तो कामगारांना वर्ग करावा लागते. हा नियम आहे. आसवणीत फायदा झाला, तर त्याप्रमाणे वाढवून मिळेल. |
| ५) | जी रोजगार निर्मिती होणार आहे, त्याचा स्थानिकांना काही फायदा होईल काय? | शैक्षणिक अहर्तेप्रमाणे स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. त्यावेळी श्री शेख यांनी रोजगारात स्थानिक व परिसरातील गावांतील लोकांनाच प्राधान्य देण्याची सूचना केली. |

**३) श्री बाजीराव विठ्ठलराव खरात, राहणार-कोरेगाव, तालुका-परतूर, जिल्हा – जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्पामुळे आजूबाजूच्या परिसराचा विकास होईल असे सांगण्यात आले? तर परिसराचा विकास कुठल्या प्रकारे होईल? यातील निधी ग्रामपंचायतीला देण्यात येईल काय? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कॉर्पोरेट सामाजीक जबाबदारी निधीतून (Corporate Social Responsibility) परिसरात सामाजिक उपक्रम कारखान्यामार्फत राबविण्यात येतील उदा.रस्ते विकास,आरोग्य सुविधा इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात येतील. तर कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी हा १.०५० कोटी राखून ठेवण्यात आलेला |

| | | |
|---|---|---|
| | | असून जिल्हाधिकारी यांच्या मंजूरीनुसार परिसरात पर्यावरणीय योजना अंमलात आणण्यात येतील. |

**४) श्री भास्कर उत्तमराव, राहणार-वाढोना, तालुका-परतूर, जिल्हा — जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात दारुची निर्मिती होणार काय? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्पात दारूची निर्मिती होणार नाही, ते पेट्रोलियम ब्लेडिंगसाठी पेट्रोलियम कंपन्यांना देण्यात येईल. |

**५) श्री उत्तमराव भरत माने, राहणार-परतूर, तालुका-परतूर, जिल्हा-जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामुळे ऊसदरवाढीची काही शक्यता आहे काय? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आताच एफआरपी बाबत व प्रकल्पातील फायदा वाढल्यास तो कामगारांना वर्ग करण्याबाबत चर्चा झालेली आहे. |

**६) श्री सय्यद इसशर सय्यद हसीम, राहणार-वरफळ,तालुका-परतूर, जिल्हा-जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प उत्पादनामुळे परिसरातील नागरिकांना, जनावरांना वासाचा त्रास होईल काय? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात संपूर्ण बंदिस्त यंत्रणा (closed system) कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना, जनावरांना कुठलाही वासाचा त्रास होणार नाही. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, प्रश्न, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**७) श्री दत्तात्रय अंकुशराव डोईजड, राहणार-वरफळ, तालुका-परतूर,जिल्हा-जालना:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | यापूर्वीही जनसुनावणी झालेली आहे. त्याचा निकष त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडून होकारार्थी देण्यात आलेला होता. तरीही परत आता जनसुनावणी का घेण्यात आली? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मागच्यावेळची जनसुनावणी ही ८० केएलपीडीसाठी आयोजित करण्यात आलेली होती. मात्र त्यासाठी मंजूर करण्यात आलेला टीओआर यांची मुदत ही संपलेली होती. त्याचवेळेस कारखान्याने १२० केएलपीडी स्थापन करण्याचे ठरविले. त्यामुळे ईआयए अधिसूचनेनुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याने ती परत आयोजित करण्यात आलेली आहे. |
| २) | चर्चेमध्ये सीईआर निधीबाबत सांगण्यात आले. तर त्याबाबत माहिती देण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कारखान्याने कॉर्पोरेट पर्यावरण निधी हा १.०५ कोटी राखून ठेवलेला असून जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसारच प्रकल्प परिसरात खर्च करण्यात येईल. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुन्हा उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. प्रतिनिधी, उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, जालना यांनी सांगितले की उपस्थितांच्या सूचना, आक्षेपांना पर्यावरण सल्लागार यांनी उत्तरे दिलेली आहेत. सदरहू सूचना, आक्षेप व त्यास दिलेली उत्तरे यांची नोंद घेण्यात आलेली असून सदरहू बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम

पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह  मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

प्रतिनिधी, उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, जालना  यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व  अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती मान्यतेने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| **सो. म. कुरमुडे** | **केशव नेटके** |
| (समन्वयक) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना. |
| म.प्र.नि. मंडळ, जालना. | |

**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING FOR PROPOSED ESTABLISHMENT OF 120.0 KLPD DISTILLERY UNIT CAPACITY TO PRODUCE 120.0 KLPD RECTIFIED SPIRIT/EXTRA NEUTRAL ALCOHOL/FUEL ETHANOL PLANT BASED ON SUGARCANE SYRUP/"C" MOLASSES/"B" HEAVY MOLASSES AS RAW MATERIAL & EXPANSION OF SUGAR CRUSHING CAPACIY FROM 2,500 TCD TO 4,500 TCD, LOCATION AT VILLAGE WARPHAL, TALUKA-PARTUR, DISTRICT – JALNA, MAHARASHTRA PROPOSED PRODUCTION BY M/S SHRADDHA ENERGY & INFRA PROJECT LIMITED (SEIPL),VILLAGE-WARPHAL, TALUKA-PARTUR, DISTRICT – JALNA, MAHARASHTRA.**

The Public Hearing for the proposed establishment of 120.0 KLPD distillery unit capacity to produce 120.0 KLPD Rectified Spirit/Extra Neutral Alcohol/Fuel Ethanol Plant based on sugarcane syrup/"C" Molasses/"B" Heavy Molasses as raw material and expansion of sugar crushing capacity from 2,500 TCD to 4,500 TCD at Village-Warphal, Tal-Partur, Dist-Jalna, Maharashtra as proposed by the Project Proponent M/s Shraddha Energy & Infra Project Limited (SEIPL), Village-Warphal, Taluka-Partur, District – Jalna, Maharashtra is conducted on, 14th July, 2022, at the project site on 12.00 noon.

As per the Notification No. S. O. 1533 dated 14-09-2006 issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (MoEFCC, GoI), New Delhi and subsequent amendment No. S.O.3067 (E) on 01-12-2019, Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai has constituted Public Hearing Panel vide Board's Office Order No. E- 64 of 2022 under letter no. BO/JD (WPC)/PH/B- 220630/FTS-0130 dated 30th June, 2022.:-

Following Panel members were present during the public hearing:

1. **Shri. Keshav Netake,**
   Additional District Magistrate, Jalna,
   Dist: Jalna. — Chairman.

2. **Shri. S.M. Kurmude,**
   Sub-Regional Officer,
   M.P.C. Board, Jalna. — Convener.

Dr. Yogini Balankhe, Field Officer, Sub Regional Office, MPCB, Jalna welcomed Shri. Keshav Netke, Additional District Magistrate, Jalna and Chairman of the Environment Public Hearing Committee; Shri. Somnath Kurmude, Sub Regional Officer, MPCB, Jalna Membern & Convener of the Environment Public Hearing Committee, Environmentalists, NGOs, Journalists and Company Officials and local people/participants who were present. Further, She informed that as per the Environment Impact Assessment Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEF & CC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public consultation to certain projects which are covered in the schedule of the said Notice. Hence this Public Hearing is conducted on today.

Dr. Yogini Balankhe, said that Maharashtra Pollution Control Board was in receipt of application from Project Proponent M/s Shraddha Energy & Infra Project Limited (SEIPL), Village-Warphal, Taluka-Partur, District – Jalna, Maharashtra, for their proposed establishment of 120.0 KLPD distillery unit capacity to produce 120.0 KLPD Rectified Spirit/Extra Neutral Alcohol/Fuel Ethanol Plant based on sugarcane syrup/"C" Molasses/"B" Heavy Molasses as raw material and expansion of sugar crushing capacity from 2,500 TCD to 4,500 TCD at Village-Warphal, Tal-Partur, Dist-Jalna, Maharashtra.

She, further informed that this existing project is established outside the Industrial Zone and as per EIA Notification, 2006, the category of project falls under Category A 5 (g), which requires to obtain prior Environmental Clearance from the Environment, Forest & Climate Change Department, Govt of India, New Delhi for which prior environmental consultation is mandatory.

She informed that the aim of conducting prior public consultation is to make aware, local people who can be participant in the hearing and they should know the developmental activities and Environment Management Plan of the unit.

Project Proponent had appointed M/s Green Circle, Vadodara as Environment Consultant and had submitted online prescribed application alongwith pre-feasibility report to the Environment, Forest & Climate Change Department, Govt. of India, New Delhi for obtaining Terms of

Reference (ToR) for conduct of EIA studies and Environment, Forest & Climate Change Department, Govt. of India, New Delhi has considered the project and given approval on 19th February, 2022.

As per said Notification, 30 days' advance public notice was published by Sub Regional Office, MPCB Jalna in the Local Newspaper in Daily Sakal (Marathi) on 14th June, 2022 and in National Newspaper daily The Times of India (English) on 13th June, 2022. The public were appealed to send their suggestions, views, doubts or objections regarding the proposed unit.

Also copy of EIA report and executive summery were made available at various notified offices of Government i.e. Ministry of Environment, Forest & Climate Change, Zonal Office, West Central Zone, New Secretariat Building, Ground Floor, East Wing, Civil Line, Nagpur-440 001; Collector Office, Jalna, Chief Executive Officer, Zilla Parishad Office, Jalna; General Manager, District Industries Centre Office, Jalna; Tahsildar, Taluka Office – Partur, District – Jalna; Gram Sevak, Grampanchayat office at Warphal, Koregaon, Chincholi, Mapegaon, Warphal Revalgaon, Tal – Partur, Dist – Jalna; Environment & Climate Change Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, 15th floor, Madam Cama Road, Mumbai; Sub Regional Office, MPCB, Jalna; Regional Office, MPCB, Aurangabad and at Head Office of MPCB at Mumbai, and on the website of MPCB. The public were appealed to send any suggestion or objection regarding the proposed new project to respective offices.

Dr. Yogini Balankhe, informed that not a single objection is received by the Sub Regional Office, MPCB, Jalna till today. She informed all the participants that an opportunity is given to raise the suggestions or objections in writing or orally. She further informed that this Committee is constituted to take note of suggestions, views or objections regarding the proposed project The views, suggestions or objections raised by the participants during the meeting will be noted and the minutes of the meeting will be made in Marathi and English and it will be submitted along with the final EIA report, written suggestions, objections through Head Office of MPCB to MoEF & CC, Govt. of India, New Delhi. An Expert Committee will take further decision regarding the project.

Dr. Yogini Balankhe requested project proponent/their consultant to give presentation of the project.

Then, the Project Consultant started the power point presentation of the existing and proposed project including the details of project, environmental pollution, plans, devices, control measures to be taken thereof.

After presentation, Member, Convener, Environment Public Hearing Committee appealed the participants to raise their views, suggestions or objections regarding propose plant in environmental angle only. It is informed that while raising the suggestions, full name and address should be informed.

**Following persons have taken part in the discussions and the answers given by Project Environment Consultant/Project Proponent/ Environment Public Hearing Committee:-**

1) **Shri Ramkishan Bhashroba Rupnar, Residence-Varphal Gaon, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | Various machines and machinery will be used in the project. So whether the residents of the area will suffer due to this noise? | The Project Environmental Consultant replied that in the distillery units, no heavy noise generating machinery is used. Similarly, noise pollution control devices will be installed in the project. The noise level will be controlled through silencer pads at various locations in the project. Ear plugs/muffs shall be provided to workers working near noise generating machines. The noise level in the project site will be less than the prescribed limits. Therefore, the residents of the surrounding area will not be |

| | | |
|---|---|---|
| | | disturbed by the noise. |

2) **Shri Masarat Nadim Shaikh Shaikh Shekhur, Sarpanch, Varfal Gram Panchayat, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | Can the waste water generated in the production process be used by farmers in the area? | The Environmental Consultant explained that the waste water generated in the project will be processed in the Condensate Polishing Unit (CPU) and it will be recycled and reused in the production activities.<br>Not a drop of treated effluent will be generated outside the factory. The Project is ZLD -Zero Liquiid Discharge Project. |
| 2) | Whether the spent wash from the production activities will cause any ill-effects in the area? | Environment Consultant answered that the spent wash from the project will be dried and converted into powder and made available to the farmers as fertilizer. It contains rich potash. |
| 3) | How the ash will be disposed of? | The ash generated in the project will be given to local brick manufacturers for making bricks. The demand for ash from them is huge. |
| 4) | Whether local people will get benefit due to this project? Whether farmer will get more price for sugarcane in future? | Environment Consultant answered that the additional income to the factory will enable the farmers to pay higher price for their sugarcane. Due to the increase in the sugar crushing capacity, the sugarcane of the farmers will be crushed |

| | | |
|---|---|---|
| | | immediately. This will increase the yield of sugarcane and production. As the factory will get extra profit, the surrounding farmers will also get the benefit.<br>At that time, Chairman of the factory said that FRP is given at 100%. Another formula is 70:30. If the profit is more than 30%, it has to be shared with the workers. This is the rule. If there is benefit in cultivation, it will be increased accordingly. At that time, Chairman of the project said that the distillery does not make more than 40% profit. So, it will be increased accordingly. |
| 5) | Will the creation of jobs in the project have any benefit to the local people? | Local people will be given job opportunities according to educational qualification. At that time, Shri Shaikh suggested to give priority to the people of local and surrounding villages in employment. |

3) **<u>Shri Bajirao Vitthalrao Kharat, Residence – Koregaon, Tal – Partur, Dist – Jalna :-</u>**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | It is informed here that the surrounding area will be developed due to the said project? So how area will be developed? Whether the funds will be given to the Gram | Project Proponent informed that various social welfare schemes will be implemented through CSR Fund - Corporate Social Responsibility Fund e.g. road development, health services etc. |

| | | |
|---|---|---|
| | Panchayat? | And Rupees 1.050 crores CER fund i.e. Corporate Environment Responsibility Fund is reserved and after prior approval of District Collector, various environmental programmes will be implemented. |

4) **Shri Bhaskar Uttamrao, Residence – Wadhona, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | Whether liquor will be produced in the project? | The Environmental Consultant said that the project will produce Ethanol, which will be supplied to petroleum companies for petroleum bending no liquor will be produced. |

5) **Shri Uttamrao Bharat Mane, Residence – Partur, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | Is there any possibility of sugarcane price hike due to this project? | The Environmental Consultant said that only now there has been a discussion about FRP and if the benefits of the project increase, it will be transferred to the workers. |

6) **Shri Sayyad Esshar Sayyad Hasim, Residence – Varfal, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | **Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions** |
| 1) | Due to production activities, whether surrounding local people and animals will suffer smell nuisance? | The Environmental Consultant replied that a complete closed system will be implemented in the project. Therefore, the residents and animals of the area will not suffer from any smell nuisance. |

Convener, Environment Public Hearing Committee appealed all the participants to raise any suggestion or objection in environmental angle only regarding the proposed project.

**7) Shri Dattatraya Ankushrao Doijad, Residence – Varfal, Tal – Partur, Dist – Jalna :-**

| Sr. No. | Question / Suggestion / Objection | Answers / Assurances given by the Project Proponent / Environment Consultant / Public Hearing Committee following the discussions |
|---|---|---|
| 1) | The public hearing for this was conducted previously of this company. District Collector has given positive opinion regarding the project at that time. Then why this public hearing is conducted again? | The Project Environmental Consultant replied that the previous Public Hearing was held for 80.0 KLPD. But the time period of approved TOR expired. At the same time, the factory decided to set up 120.0 KLPD distillery. Hence, as per EIA Notification, it is mandatory to conduct Environment Public Hearing again. Hence this conducted. |
| 2) | CER funding was discussed in the meeting, hence information should be given about it. | Environment Consultant explained that the factory has already reserved the amount of 1.05 crores as CER fund and it will be spent as per the directives of Collector for various environmental schemes in the area. |

Convener, Environment Public Hearing Committee again appealed all the participants to raise any suggestions or objections regarding the proposed project in environmental angle only.

There was no response from the participants. Dr. Yogini Balankhe, informed that the Environment Consultant has given answers to the questions, suggestions or objections as raised by the participants during the meeting. The suggestions, objections and answers are noted and it will included in the minutes of Public Hearing. The minutes in Marathi and English will be prepared and it will submitted along with the Final EIA report and written suggestions, objections through Head Office, MPCB, Mumbai to Environment, Forest & Climate Change Department, Govt. of India, New Delhi. An Expert Committee for this will take further decision.

Dr. Yogini Balankhe thanked all the participants & Chairman, Member/Convener of the Environment Public Hearing Committee declared that the Public Hearing Meeting is concluded.

The meeting ended extending thanks to the Chair.

**(S.M. Kurmude)**
Convener
And
Sub-Regional Officer,
MPCB, Jalna

**(Keshav Netake)**
Chairman
And
Additional District Magistrate, Jalna